प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
Office of the Principal Chief Conservator of Forests (HOFF), Maharashtra State
वन भवन, रामगिरी रोड, सिविल लाइन्स, नागपूर ४४०००१ Van Bhavan Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440001
प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
pccfwlngp@mahaforest.gov.in; फोन Phone: 0712-2549563; फॅक्स Fax: 0712-2553018; वेबसाइट: www.mahaforest.gov.in

# परिपत्रक

विषय :- फौजदारी अर्ज क्रमांक 181/2018 मध्ये उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपिठ यांनी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 50(8) ची अंमलबजावणी बाबत दिनांक 26/9/2018 ला दिलेले आदेश.

क्रमांक कक्ष-23(6)/वजी/प्र.क्र.24(18-19)/ 3256
नागपूर - 440 001, दिनांक - 15/12/2018

वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 अंतर्गत जे वनगुन्हे घडतात त्यासंबंधी चौकशी करण्याचे अधिकार वरील अधिनियमा अंतर्गत विविध कलमान्वये तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अधिसूचने नुसार प्रकरणाची चौकशी प्रक्रिया पुर्ण करुन अधिनियमातील कलमांचे अधिन राहुन अंतीम आदेश निर्गमीत करण्यात येते व काही प्रकरणे न्यायालयात तक्रार दाखल करुन न्यायप्रविष्ठ करण्यात येतात.

विषयांकीत न्यायालयीन प्रकरण हे वनपरिक्षेत्र अधिकारी, शिवणी जिल्हा चंद्रपूर यांचे कार्यक्षेत्रातील असुन सदर प्रकरणात 'वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 9 व 27' चे उल्लंघन केल्याने सुर्यभान मोतीराम नन्नावरे व इतर 12 आरोपीं विरुध्द न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिंदेवाही यांचे न्यायालयात फौजदारी तक्रार क्रमांक 11/2008 दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी होऊन आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. त्याविरुध्द संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज सादर करुन न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिंदेवाही यांचे आदेशाविरुध्द अपील स्विकारण्याची विनंती केली होती. मा.उच्च न्यायालयानी सदर प्रकरणी दस्ताऐवजाची व झालेल्या निर्णयाची पडताळणी केली व फौजदारी अर्ज फेटाळून लावला व अपील सुध्दा रद्दबातल ठरविला.

फौजदारी अर्ज फेटाळून लावतांना मा.उच्च न्यायालयांनी "In the prosecutions under the Wildlife Protection Act, 1972, the prosecution relies on the confessional statements of the accused, however as per Section 50(8) of the Act of 1972, powers under Section 50(8) have to be exercised by an officer not below the rank of Assistant Director of Wildlife Preservation or an officer not below the rank of Assistant Conservator of Forests on the authorization of the State Government in this behalf, but powers under Section 50(8) of the Act of 1972 are exercised by the Sub-ordinate Officers like Foresters and many a times, the authorization by the State Government in favour of the Officer is not produced." शेरे नोंदवून खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

"The Principal Chief Conservator of Forests (Wildlife) Maharashtra State, should examine this matter and issue appropriate directions to all the concerned throughout the State by proper notification and/or circular."

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक 26/9/2018 ला दिलेल्या वरील आदेशाला अनुसरुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 50(8) अंतर्गत असलेले अधिकार

अ) शोध वारंट जारी करणे.

ब) साक्षीदार उपस्थित राहण्यासाठी अंमलबजावणी करणे.

क) कागदपत्रे आणि भौतिक निबंधाचे शोध आणि उत्पादन करण्यास उद्युक्त करणे आणि

ड) पुरावा प्राप्त करण्यासाठी आणि रेकॉर्ड नोंदविण्यासाठी.

महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग यांचे क्रमांक डब्ल्युएलपी-0613/प्र.क्र.199/फ-1 दिनांक 21 जुलै, 2013 ची अधिसूचना नुसार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक, मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, उपवनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील उपसंचालक, स्वतंत्र उपविभागांचे उपविभागीय वन अधिकारी आणि सहाय्यक वनसंरक्षक यांना प्रदान केलेले आहेत. कलम 50(9) नुसार

कलम 50(8)(ड) अन्वये नोंदविलेले पुरावे प्रकरणात न्यायायीक दंडाधिकारी यांचेकडे होणारी पुढील सुनावणीत ग्राह्य धरले जाईल, अशी तरतूद आहे.

तरी यापुढे वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 अंतर्गत कोणताही गुन्हा घडला असेल तर त्यामध्ये आरोपीचे व साक्षीदाराचे अंतीम बयान व इतर पुरावे नोंदवितांना सहाय्यक वनसंरक्षक पेक्षा कमी दर्जा नसलेले अधिका-या समक्ष नोंद करण्यात यावे. पुरावे नोंदवितांना आरोपी त्याठिकाणी उपस्थित राहील, याची दक्षता घेण्यात यावी. सहाय्यक वनसंरक्षक यांनी बयान नोंदवितांना सदरची नोंद वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 50(8) अंतर्गत दिलेल्या अधिकारानुसार करण्यात येत असल्याची नोंद सुध्दा करावी.

वरील निर्देश सर्व क्षेत्रीय कर्मचा-यांचे निदर्शनास लेखी स्वरुपात तात्काळ आणून द्यावे. सदर निर्देशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे, याबाबत संबंधीत विभागाचे उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी/ स्वतंत्र विभागाचे उपविभागीय वन अधिकारी/ व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक यांनी वेळोवेळी खात्री करावी.

सहपत्र - मुंबई हायकोर्टाचे आदेश सोबत जोडले आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर/पश्चिम मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) सर्व
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक (सर्व)
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक (सर्व)

प्रतिलिपी - सचिव (वने) महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांना माहितीस सादर.
प्रतिलिपी - प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सादर.
प्रतिलिपी - व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमीटेड, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी - प्रसिध्दी व माहिती अधिकारी (वने) महाराष्ट्र राज्य, नागपूर

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH : NAGPUR

CRIMINAL APPLICATION (APPA) NO. 181/2018
IN
CRIMINAL APPEAL NO. /2018

State of Maharashtra, Through the Range Forest Officer, Chandrapur
..VS..
Suryabhan Motiram Nannaware (Dead) Thru LR's & ors.

| Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's orders of directions and Registrar's orders | Court's or Judge's orders |
|---|---|

Ms. S.V. Kolhe, APP for the applicant/appellant
Shri R.M. Nikure, Advocate for the non-applicant/respondents

CORAM : Z.A.HAQ, J.
DATED : 26/09/2018

Heard.

By the impugned judgment, the learned Magistrate has acquitted the accused of the charge of commission of the offences punishable under Section 9 and Section 27 of the Wildlife Protection Act, 1972. The State has challenged the judgment by filing appeal and is praying for grant of leave to file the appeal.

The evidence on record is considered by the learned Magistrate and discussed in para no. 18 of the impugned judgment. The evidence brought on record at the most shows that according to the prosecution, the accused had laid the trap to hunt the wild animals. The learned Magistrate has recorded that the evidence brought on record by the prosecution is not sufficient to hold that the accused had laid the trap. It is observed that the prosecution has not brought any evidence on record to show that any wild animal is killed or injured by the traps alleged to have been laid by the accused.

I find that the conclusions of the learned Magistrate are based on proper appreciation of evidence on record. The learned APP has not been able to point out that any relevant and material evidence brought on record by the prosecution has not been considered by the learned Magistrate.

In view of the above, I find that the State has not made out any case for grant of leave to file the appeal to challenge the judgment passed by the learned Magistrate acquitting the accused.

The criminal application is **dismissed**. Consequently, the appeal is **rejected**.

In the prosecutions under the Wildlife Protection Act, 1972, the prosecution relies on the confessional statements of the accused, however as per Section 50 (8) of the Act of 1972, powers under Section 50 (8) have to be exercised by an officer not below the rank of Assistant Director of Wildlife Preservation or an officer not below the rank of Assistant Conservator of Forests on the authorisation of the State Government in this behalf, but powers under Section 50 (8) of the Act of 1972 are exercised by the Subordinate Officers like Foresters and many a times, the authorization by the State Government in favour of the Officer is not produced.

The Principal Chief Conservator of Forests (Wildlife) Maharashtra State, should examine this matter and issue appropriate directions to all the concerned throughout the State by a proper notification and/or circular.

The action taken report shall be placed on record of this application, alongwith affidavit of the Principal Chief Conservator of Forests (Wildlife) Maharashtra State, within four weeks.

HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY



The learned APP to communicate this order immediately.

Copy of this order duly authenticated by Personal Assistant be given to the learned APP.

**JUDGE**

*Ansari*